Vol 2 Issue 1 Feb 2012

ISSN No : 2230-7850

## International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

## Welcome to ISRJ

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

### Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Research Papers

# दक्षिण अशियाई राष्ट्रांच्या विकासावर दहशतवादाचे संकट

*डॉ मारोती तुकाराम घंटेवाड*
राज्यशास्त्र विभाग, वंसुधरा कला , महाविद्यालय, जुळे सोलापूर.

***प्रस्तावना –***

दक्षिण अशियाई क्षेत्रावर कोणत्या ना कोणत्या राष्ट्राचे कोणत्या ना कोणत्या कारणामुळे वर्चस्व होते हा इतिहास पुराव्यसह जणू साक्ष देतो. आज दक्षिण अशियाई क्षेत्र जगाच्या तुलनेत सर्वात खतरनाक क्षेत्र म्हणुन ओळखले जाऊ लागले आहे. त्याचबरोबर युरोपीय राष्ट्रांची नजरही अशियाई राष्ट्रांच्या विकासाकडे अधिक दिसत आहे. त्यामुळेच या क्षेत्रावर दहशतवादाचे भयानक संकट निर्माण झाले आहे. पाश्चिमात्य तत्ववेतेच्या मते ईराण आणि उत्तर कोरीया नंतर जगातील खतनाक संवेदनशील क्षेत्र म्हणजे दक्षिण अशियाई क्षेत्र मानले आहे. आज दक्षिण अशियाची स्थिती, सतत बदलत आहे. कारण भारत – पाकिस्तान संघर्ष असो, काश्मिरचा प्रश्न असो, श्रीलंकेतील सिंहली व तामिळी यांच्यातील संघर्ष असो, नेपाळमधील माओवादी संघर्ष असो, किंवा बांग्लादेशातील फरक्का पाणी वाटपाचा प्रश्न किंवा नवीन मुस्लीम कटरवाद असो, निर्वसाहतीचा प्रश्न असो. किंवा अफगाणिस्तान मधील तालीबानी गटाचा उदय आणि त्यांनी घडवून आणणारे हिसांचारी कृत्य असो किंवा पाकिस्तान पुरस्कृत सिमापार दहशतवाद असो यामुळे एकूनच आशियातील राष्ट्रांच्या विकासावर, हिंसाचारी दहशतवादाचे सावट आहे. हा दहशतवाद एका राष्ट्राची समस्या नसून जागतीक स्वरूपाच्या समस्येचे रूप धारण केले आहे. हा दहशतवाद सामाजिक व्यवस्थेचे एक अंग बनले आहे. त्यामुळे ही एक जागतीक समस्या आहे. दक्षिण आशियाई राष्ट्रे विशेषःत भारत देश गेली दोन दशके विविध प्रकारच्या दहशतवादी कृत्यास विविध पातळीवर तोंड देत आहे. आणि ज्या देशात दहशतवादी कारवाया आणि हल्ले होतात अशा राष्ट्रांतील जखमी नागरीकांना भारत धावून मदतही सातत्याने करीत असताना दिसून येते. चीन, रशिया, श्रींलका, भूटान, नेपाळ, बांगलादेश, पाकिस्तान, भारत आणि अफगाणीस्तान अशी अनेक अशियाई राष्ट्रे दहशतवादाच्या कारवायाचे बळी ठरत आहेत. त्याबरोबर आज अमेरिका , इंग्लड, फ्रान्स, जपान, इराण, इराक, इस्त्राईल, आणि पॅलेस्टाइन सारख्या देशावरही दहशतवादी हल्ले होताना दिसून येतात. अशा या भंयकर जीवघेण्या दहशतवादी कृत्याचा दक्षिण आशियातील राष्ट्रांच्या तसेच पूर्व आशिया आणि युरोप खंडातील राष्ट्रांच्या राजकारणावर तसेच सामाजिक व आर्थिक विकासावर त्याचा परिणाम होत आहे. 20 व्या शतकात या दहशतवादी कृत्याने आधिकच उग्र रूप धारण केले आहे.

***दहशतवादाची व्याख्या –***

दहशतवाद म्हणजे काय ? दशतवादी कोणाला म्हणायचे या प्रश्नाची उत्तरे देणे सोपे नाही. दहशतवादाचा उल्लेख हा प्रामुख्याने नकारात्मक दन्रष्टीने केला जात असल्यामुळे स्वतहास दहशतवादी संबोधून घेण्यास कोणही तयार नसते राजकीय उद्दिष्टयांसाठी हिंसाचाराचा अवलंब करणाऱ्या व्यक्तीनां एक राष्ट्र दहशतवादी म्हणुन संबोधले तर दुसरे राष्ट्र त्याचा उल्लेख स्वांतत्र्य सैनिक म्हणून करतो. त्यासाठी आपण काही उदाहरणे पाहणे आवश्यक आहे. भारतातील ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी, जुलमी, अत्याचारी सत्तेविरूध्द सशस्त्र लठा देणारे भगतसिंग, राजगूरू सुखदेव हे क्रांतिकारक भारतीयांच्या दृष्टीने स्वांतत्र्य सैनिक होते. तर ब्रिटीश सरकाच्या दृष्टीकोणातून त्याची वर्गवारी दहशतवादी गटात केली. तसेच भारताच्या जम्मू–काश्मीर क्षेत्रातील अतिरेकी हे भारताच्या दृष्टीकोणातून दहशतवादी आहेत तर पाकिस्तानच्या दृष्टीकोणतून स्वांतत्र्य सैनिक आहेत. दहशतवादाच्या अर्थाविषयी मतभेद असल्यामुळे 1998 साली स्थापन झालेल्या आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या कार्यक्षेत्रातून दहशतवादाला वगळण्यात आले आहे. वरील सापेक्षेतेमुळे दहशतवादी कोण या प्रशनाचे सर्वसामान्य उत्तरे देणे कठीण आहे तरीही ढोबळ मानाने दहशतवाद म्हणजे राजकीय उद्दिष्टयांसाठी हिंसेच्या साधनाचा वापर अशी व्याख्या करता येईल.



***1) पेग्विन राज्यशास्त्र शब्दकोशानुसार*** – "अमूलग्र राजकीय आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे म्हणजे दहशतवाद होय."

***2)बोआझ गॅनर*** –ः " राजकीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी नागरी लक्ष अथवा सामान्य नागरीक त्यांच्या विरोधात हिंसेचा प्रत्यक्ष वार करणे किंवा तशी धमकी देणे." याला दहशतवाद असे म्हणतात थोडक्यात दहशतवादी कृती म्हणजे अतिशय शुत्रबध्द , सुनियोजित, आणि संघटित हिंसाचार असतो.

***दहशतवादाचे स्वरूप*** –

दहशतवाद हा एक राष्ट्रापुरता किंवा खंडापुरता मर्यादित राहिलेला नसुन त्याचे स्वरूप हे जागतीक झालेले दिसून येते. दहशतवाद म्हणजे भीती, दरारा आणि अनिश्चितीचे वातावरण तयार करून काही राजकीय उद्दिष्टायांच्या पूततेसाठी शासनावर, लोकमतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. दहशत निर्माण करण्यासाठी भय, बॉम्बस्फोट, अपहरण यासारख्या साधनांचा अवलंब केला जातो. दहशतवाद ही 'शासनाविरोधी कृती' म्हणून जरी या संकल्पनेचा उल्लेख केला जात असलो तरी आज अनेक राष्ट्राविरूध्द किंवा अंतर्गत विरोधकांचा बीमोड करण्यासाठी करीत असल्यामूळे या संकल्पनेचे स्वरूप अतिशय गुंतागुंतीचे बनलले आसल्याचे दिसून येते.

***दक्षिण आशियाई राष्ट्राच्या विकासावर दहशतवादांचे संकट*** –

वर्तमान कालखंडात जगातील क्षेत्रामध्ये दहशतवादाचे संकट नवनवीन रूपात समोर येत आहेत. या संकटाचा विचार करता दक्षिण आशियातील राष्ट्रांना आधिकच जागृत किंवा संरक्षणाच्या आणि विकासाच्या दृष्टीकोनातुन दक्षता घेतली पाहिजे. भारत स्वातंत्र्य प्राप्ती पासून दहशतवादाशी झुंज देत आला आहे. परंतु आज दहशतवाद जैविक आणि रासायनिक साधनांचा प्रयोग करीत घबराट निर्माण करण्यावर अधिकच भर देत आहे. यासाठी जागतिक आरोग्य संघटनेने या संदर्भात जगातील सर्व राष्ट्रांना सावध राहण्याचा इशारा दिला आहे. तसेच भारतीय केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने सुध्दा राज्य सरकारांना आतिदक्षतेचा आणि जागृत राहण्याचा इशारा दिला आहे. दहशतवादी जेव्हा आत्मघाती हल्ले करण्यासाठी घुसखोरी करतात तेव्हा त्यांना थांबविणे कठीण आहे. म्हणून आपली सुरक्षा व्यवस्था अंग काढून घेऊ शकत नाही तर त्यासाठी अधिक कडेकोट बंदोबस्त करून आत्मघाती हल्ले उधळून लावण्याचे कार्य सुरक्षा व्यवस्था करीत असते. त्यासाठी सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी आज अधिक वाढलेली आहे. आज ही जमू–काश्मीर मधील दहशतवादी भीती पहिल्यापेक्षा कमी नाही., विधानसभेच्या निवडणुकावेळी हल्ले होत आहेत. हल्ले, बॉम्बस्फोट, अपहरण यास आपण रोकू शकतो परंतू वायूप्रदूषणातून दहशतवादी मानवी जिवनावर संकट आणत आसतील तर त्याचा सामना करणे कठीण आहे. भारतावर अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. त्यातील प्रमुख घटना.



1993 साली मुंबई हल्ला यात 57 लोक मारले गेले असून 1000 नागरीक जखमी झालेले आहेत. 14 फ्रेबुवारी 1998 रोजी कोईबतूर येथे झालेल्या बॉम्बस्फोटात 58 लोक मारले गेले असून 200 लोक जखमी झाले, डिंसेबर 2001 साली भारतीय संसद दिल्ली येथे बॉम्बफोट होऊन दहशतवादयासहीत 17 लोक मारले गेले, 26 जानेवारी 2002 साली अमेरिकन सेंटर कलकत्ता या ठीकानी स्फोट घडवून आनला गेला यात 4 लोक मारले गेले असून 20 लोक जखमी झाले 30 मार्च 2002 रोजी जम्मू येथील रघुनात मंदिर येथे स्फोट घडवून आला यात 10 लोक मारले गेले आणि 19 जखमी व दोन दहशतवादी ठार झाले. 14 नोव्हेंबर 2002 रोजी पुन्हा जम्मू येथील रघुनाथ मंदीराजवळ स्फोट घडवून आणला त्यात 13 लोक ठार झाले त्यात दोन दहशतवादयाचा समावेश होता तर 43 लोक जखमी झाले , 25 ऑगस्ट 2003 रोजी मुंबई येथे बॉम्बस्फोट यात 53 लोक ठार तर 150 लोक जखमी झाले, 29 अक्टोबर 2005 रोजी दिली कांड यात 59 लोक ठार तर 155 जखमी , 25 ऑगस्ट 2007 रोजी हैद्राबाद येथील बॉम्ब स्फोटात 42 लोक ठार तर अनेक लोक जखमी अर्थात भारताच्या कानाकोपऱ्यात सतत दहशतवादी कृत्य घडताना दिसून येत आहे ही कृत्य भारताच्या विकासाआड येऊन एक नवीन समस्या निर्माण केली आहे जसे भारतात कृत्य करीत आहेत तशाच प्रकारचे कृत्य दक्षिण आशियाई राष्ट्रात करीत आहेत 24 जुलै इसिस या दहशतवादी संघटनेकडून आफगाणिस्तानची राजधानी काबूल मध्ये अल्पसंख्याक हजारा लोकांच्या मोर्च्यात घडवून आनलेल्या दुहेरी आत्मघातकी बॉम्बस्फोटात 80 ठार तर 231 नागरीक जखमी झाले. अशा भयावक आत्मधातकी दहशतवादी कृत्यामुळेच दक्षिण आशियातील विकासात अस्थिता दिसून येत आहे.

***दहशतवादाचा मुकाबला करणे*** –

राष्ट्राच्या अंर्तगत आणि बाह्य सुरक्षा यंत्रनेच्या दृष्टीकोणातून परस्पर सहकार्य करणे आत्यावश्क बनले आहे. त्याही पलीकडे जाऊन, सिमापार दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी विविध राष्ट्रांच्या सुरक्षा यंत्रणामधील सहकार्य आणि देवाणघेवाण करण्याची ही अत्यंत आवश्यकता निर्माण झाली आहे. दहशतवादाला मुळातून नष्ठ करणे, हे तेवठे काम सोपे नाही . महत्वाचा मुद्दा म्हणजे संभाव्य दहशतवादी कारवाया विषयी आधिकाधीक आणि बिनचूक माहिती मिळविणे, याबाबतीत विविध देश सहकार्य करणे गरजेचे आहे. आज अनेक देश त्यादृष्टीने करार ही करीत आहेत. भारताने आजपर्यंत दहशतवाद नष्ट करण्यासाठी रशिया, चीन, अमेरिका देशासोबत करार करून दहशतवाद संपविण्यासाठी एकमेकांच्या हातात हात देत आहेत. दहशतवादी संघटनांचे आड्डे आणि ठिकाण उधवस्त करीत आहेत तसेच . दहशतवादी संघटनांचे प्रमुख सुत्रधार शोधून काढून ठार करीत आहोत उदा. ओसामा बिन लादेन त्याहीपेक्षा जे राष्ट्र दहशतवादाला आधिक सहकार्य आणि सहारा देत आहे अशा राष्ट्रांचा अमेरीकेसाख्या राष्ट्राने तात्काळ आर्थिक नाकेबंदी पूर्णपणे बंद केल्यास दहशतवादाची नर्सरी म्हणून संबोधल्या जाणाऱ्या राष्ट्राला चाप बसेल तसेच दहशतवादी संघटनांचे शस्त्रास्त्रे आणि पैसाचे स्त्रोत शोधून काठुन त्यास प्रतिबंध घालणे. पकडलेल्या प्रतेक दहशतवादी व्यक्तीविरूध्द जलदगतीने कायदेशिर खटले चालवून गुन्हा सिध्द झाल्यास आधिकाधीक कठोर शिक्षा देणे ती शिक्षा लाईव्ह असावी जेणेकरून अशी कृत्य करणाऱ्या दहशतवादयांना दिसेल आणि ते तशाप्रकारची कृत करणापासून थांबतील.

***सारांश***

सशस्त्र कारवाई ही दहशतवादी विरोधातील कार्याची एक महत्वाची बाजू असते. परंतु त्यामुळे दहशतवादी कृत्य थांबेलच असे नाही दहशतवादी कृत्यामागील कारणांचा आणि त्यांच्या मागण्याचा गंभीरपणे विचार करणे तेवठेच आवश्यक आहे.

दहशतवादाच्या कारवाया समर्थनीय नसल्या तरी दहशतवादी संघटनांच्या मागण्या न्यायवादी असू शकतात. अशा प्रकारच्या मागण्यांचा सहानुभूतिपूर्वक व चिकित्सकपणे विचार करून उपलब्ध घटनात्मक चौकटीमध्ये त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणे. हे दहशतवादा विरोधातील एक महत्वाचे पाऊल आहे असे केल्यामुळे दहशतवादी गटांना मिळणारी सहानुभूती आणि आर्थिक मदत संपविणे सोपे होऊन, मजबुत सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख व लोककल्याणकारी राजकीय व्यवस्थामय प्रक्रिया विकसीत करून दहशतवादास प्रतिबंध घालणे शक्य होईल त्यामुळे दक्षिण आशियाई राष्ट्राच्या विकासावरील दहशतवादाचे सावट निश्चितच कमी होण्यास वेळ लागणार नाही.

***संदर्भ*** –

1) एन.एम.पलसानिया,आंतरराष्टीय आतंकवाद एवं भारत को नई सुरक्षात्मक चुनौतिया,राज पब्लिशिंग हाऊस , जयपूर, 2010
2) बी.पी.दत्त,स्वंतत्र भारत की विदेश नीति, नेशनल बुक ट्रस्ट इंडीया, नई दिल्ली ,2001
3) विवेक एस.राज , भारतीय विदेश नीति सिविल सविसेज टाईम्स नई दिल्ली 2011
4) विवेक एस. राज, आशिया एवं भरत का विकास , पिज्म बुक्स जयपूर 2012
5) कृष्णकुमार रत्तु, दक्षिण आशिया आतंक का साया – राज पब्लिसींग हाउस जयपूर 2010
6) संपादकीय टिपणी – राजस्थान, पत्रिका
7) स्वरूप हरीहर – मध्य एशियाई देश
8) कमलेश्वर – नाजीवांद पेक्षा जास्त खतरनाक आहे दहशतवाद अग्रलेख
9) डॉ भुवन चंद्र आंतराष्ट्रीय दहशतवाद आग्रलेख

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org